# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०७/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र, नागपूर सा. यांच्या हस्ते नागपूर जिल्हा ग्रामीण पोलीस दलातील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निरोप समारंभ

दिनांक ३१/०७/२०२४ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण) येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **''निरोप समारंभाच्या''** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) पोउपनि. सुनिल अंबरते, सुरक्षा शाखा नागपूर ग्रामीण २) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. विजय बारई पोस्टे कळमेश्वर ३) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. राजकुमार पाण्डेय नेमणुक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ४) सहायक फौजदार श्री. बिमलेश पाण्डेय जिल्हा विशेष शाखा नागपूर ग्रामीण ५) सहायक फौजदार श्री. राजेश घिचरीया मोटार परीवहन विभाग नाग्रा. ६) पोलीस हवालदार श्री. शंकर पाल, जिल्हा वाहतुक नागपूर ग्रामीण यांना **मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र नागपूर डॉ. श्री. दिलीप पाटील-भुजबळ सा.** यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी अंमलदारांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची प्रशंसा केली.

या कार्यक्रमाला **मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र नागपूर डॉ. श्री. दिलीप पाटील - भुजबळ सा.**, मा. नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उप पोलीस अधीक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर व कार्यालयातील मानव संसाधन शाखा ना.ग्रा पोलीस निरीक्षक श्री. मानकर, महिला अंमलदार मिरा केंद्रे इतर अधिकारी व अंमलदार (स्टाफ) उपस्थित होते.











**पो.स्टे. कुही हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड**
**—: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—**

दिनांक ३०/०७/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कुही हद्दीतील संजय चव्हान रा. गजानन महाराज मंदीरच्या बाजूला वार्ड क्र १४ कुही याचे मालकीचे घरामध्ये काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती प्राप्त झाले वरून सदर पथकाने संजय चव्हान रा. गजानन महाराज मंदीरच्या बाजूला वार्ड क्र १४ कुही याचे मालकीचे घरामध्ये सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) संजय विठठल चव्हाण (२)पंकज प्रभाकर (३) राहुल परमेश्वर ईटनकर (४) पंकज दामोदर उके (५)मंगेश दिलीप महाजन (६) तर्री उर्फ आकाश गुलाबराव लेंडे** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०६ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन आरोपीतांकडुन १) हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोसा क्रं. एम एच ४० एस.आर. कि ४०,००० रू २) पॅशन मोसा क्रं एम एच ४० ए.यु. ०९४० किं. ४५,००० रू ३) अंगझडती १३,५८० ४) डावावर १९६० एकुण १००,५४८० रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कुही कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कुही येथील ठाणेदार श्री. भानुदास पिदुरकर, पोउपनि श्री. स्वप्नील गोपाले, पोहवा ओमप्रकाश रेहपाडे, नापोशि सलामे, पोअं. अनिल करडखेले, राहुल, गितेश झडाने, महिला पो अं. सिमा भुते यांनी पार पाडली.

## पोस्टे जलालखेडा हद्दीमधील अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कार्यवाही

दिनांक ३०/०७/२०२४ रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीमध्ये मा. बापु रोहोम साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात उपविभागातील अधिकारी व अंमलदार यांच्या सहाय्याने अवैध्य दारूबाबत विशेष मोहीम राबवुन मोहीमे दरम्यान ०४ वेगवेगळया ठीकाणी दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाया करण्यात आल्या त्यामध्ये चार महीला आरोपी यांचे ताब्यातुन एकुण १९० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ९५००/— रूपयाचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ सा. मा. श्री. बापु रोहोम उपविभागीय पोलीस अधिकारी सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि श्री. सी. बी. चौहान व पोउपनि रामटेके सा., मनोज शेंडे सा. , जि. पोउपनि जोशी, पोलीस अंमलदार निलेश खरडे, पुरूषोत्तम काकडे, दिनेश जोगेकर, प्रमोद बोरकुटे, महीला अंमलदार सुलोचना दुपारे, ललीता चौधरी तथा उपविभागातील अधिकारी व अंमलदार त्यांच्या पथकाने केली असुन पुढील तपास निलेश खरडे व आशिष हिरूळकर हे करित आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**